जा.क्र. ३२९ /२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर सातारा
दिनांक – ४/०५/२०२६

-: निविदा :-

दिवाणी न्यायालय व स्तर, सातारा या न्यायालयाच्या न्यायालयीन कामकाजासाठी वापरलेला व नियमानुसार विहित मुदत संपल्यामुळे नाश करावयाच्या कागद, पुठ्ठा फाडणी करुन विकणेसाठी उपलब्ध आहे. तो रद्दी कागद ज्या खरेदीदारांना विकत घेणेचा आहे त्यांनी त्यांच्या निविदा प्रतिकिलोच्या दरासह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सातारा यांचे नावे सिल बंद लखोटयात त्यावर **"रद्दी खरेदीकरीता निविदा"** असा स्पष्ट उल्लेख करुन दिनांक ०७/०५/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत अगर त्याआधी पोहोचतील अशा बेताने दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, सातारा या पत्त्यावर पाठवावी. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. सिलबंद लखोटयावर निविदादारांचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर नमूद करणे आवश्यक आहे.

१. ज्याची निविदा मंजूर करण्यात येईल त्यांनी रद्दीचा कागद दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, सातारा यांच्या अभिलेख कक्षातून स्वखर्चाने नेणेचा आहे.
२. निविदा स्विकारल्यानंतर कार्यालयातून रद्दी तीन दिवसांच्या आत उचलणेची आहे.
३. रद्दी उचलण्यापूर्वी वजनाप्रमाणे होणारी रक्कम लगेचच त्याच दिवशी भरणेची आहे.
४. सर्व प्राप्त निविदा मा. दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, सातारा यांचेपुढे उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्वीकारणे व नाकारणे बाबतचे सर्व अधिकार दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, सातारा यांना असतील.
५. निविदादारांनी निविदा उघडतेवेळी मा. दिवाणी न्यायालय व. स्तर सातारा यांचेसमक्ष हजर राहणे आवश्यक आहे.

(व्ही. पी. पाटील)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सातारा

प्रति,
१. सहा. अधिक्षक–३, दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, सातारा यांना जिल्हा न्यायालय इमारतीमधील सर्व सूचना फलकांवर आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा यांच्या फलकावर प्रसिध्द करुन त्याचा अहवाल सादर करणेकामी एक ज्यादा प्रत रवाना.
२. संगणक कक्ष, जिल्हा न्यायालय सातारा यांना सकेत स्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

T.C.

07/05/2026

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सातारा